# Regional Marathi Text Bulletin, Chhatrapati Sambhajinagar

Date – 19 May 2024

Time 18.10 to 18.20

Language Marathi

**आकाशवाणी छत्रपती संभाजीनगर**

**प्रादेशिक बातम्या**

**दिनांक – १९ मे २०२४ सायंकाळी ६.१०**

****

- लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात उद्या देशभरातल्या ४९ लोकसभा मतदार संघात मतदान
- राज्यात १३ मतदार संघात मतदान प्रक्रियेसाठी पथकं रवाना–सर्वत्र चोख सुरक्षा व्यवस्था
- काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रतापराव भोसले यांचं वृद्धापकाळानं निधन
- नैऋत्य मोसमी पाऊस निकोबार बेटांवर दाखल

आणि

- थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेत भारतीय जोडीला पुरुष दुहेरीचं विजेतपद

****

लोकसभा निवडणुकीच्या पाचव्या टप्प्यात उद्या मतदान होत आहे. देशभरातल्या आठ राज्यातल्या ४९ लोकसभा मतदार संघात ९४ हजारांहून अधिक मतदान केंद्रांवर ८ कोटी ९५ लाख मतदार उद्या सकाळी सात ते संध्याकाळी सहा या वेळेत आपला मतदानाचा हक्क बजावतील. दरम्यान, ओडीशात विधानसभा निवडणुकीसाठीही उद्या मतदान होणार आहे.

राज्यात लोकसभेच्या उत्तर मुंबई, उत्तर मध्य मुंबई, दक्षिण मुंबई, दक्षिण मध्य मुंबई, वायव्य मुंबई, ईशान्य मुंबई, धुळे, दिंडोरी, नाशिक, पालघर, भिवंडी, कल्याण आणि ठाणे या १३ मतदारसंघात उद्या २० मे रोजी मतदान होत आहे. या सर्व १३ मतदारसंघांत एकूण २६४ उमेदवार निवडणूक रिंगणात असून, यामध्ये अरविंद सावंत, पियुष गोयल, अमोल किर्तीकर, उज्जल निकम, वर्षा गायकवाड, हेमंत गोडसे, श्रीकांत शिंदे, भारती पवार, आणि शांतीगिरी महाराज आदींचा

समावेश आहे. या सर्व उमेदवारांसाठी २४ हजार ५७९ मतदान केंद्रांवर दोन कोटी ४६ लाख ६९ हजार ५४४ मतदार, आपला मतदानाचा हक्क बजावणार आहेत.

प्रसिद्ध उद्योजक आणि टाटा उद्योग समूहाचे प्रमुख रतन टाटा यांनी सर्व मतदारांना मतदानाचा घटनात्मक हक्क बजावण्याचं आवाहन केलं आहे. याबाबतचा एक ट्विट संदेश त्यांनी जारी केला आहे.

मुंबई उपनगर जिल्ह्यातल्या ४ लोकसभा मतदारसंघासाठी आज विविध केंद्रावर मतदान साहित्याचं वितरण करण्यात आलं. सर्व मतदारसंघातील मतदानासाठी नियुक्त अधिकारी आणि कर्मचारी, आवश्यक मतदान साहित्य घेऊन आपापल्या केंद्राकडे रवाना झाले.

****

नवी मुंबई पोलिस आयुक्तालयाच्या हद्दीत मतदानाच्या पार्श्वभूमीवर चार हजार पोलिस तैनात करण्यात आले आहेत. यामध्ये निमलष्करी दल तसंच गृहरक्षक दलाच्या तुकड्यांचाही समावेश आहे. या चार हजार पोलिसांमध्ये ११० अधिकारी, ३०० गृहरक्षक तसंच निमलष्करी दलाच्या सहा तुकड्या आहेत. हे सर्व पोलिस वॉकीटॉकी तसंच मेगाफोनद्वारे प्रत्येक हालचालींचा आढावा घेत आहेत. ७८ पथके ही फिरती तर स्ट्रायकिंगच्या ३४ तुकड्या तैनात करण्यात आल्या आहेत. निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर मागील काही दिवसात २० जणांना तडीपार करण्यात आलं आहे तर, ४५० जणांवर प्रतिबंधात्मक कारवाया करून त्यांना नोटिसा बजावल्याची माहिती पोलीस उपायुक्त पंकज डहाणे यांनी दिली आहे.

****

पालघर लोकसभा मतदार संघात मतदान प्रक्रियेसाठी २ हजार २७० मतदान केंद्रं सज्ज झाली आहेत. ठाणे जिल्ह्यातही ठाणे, भिवंडी आणि कल्याण या तिन्ही लोकसभा मतदारसंघात प्रशासकीय तयारी पूर्ण झाली आहे. ठाणे लोकसभा मतदारसंघात २४, कल्याण लोकसभा मतदारसंघांत २८ तर भिवंडी लोकसभा मतदार संघात १७ उमेदवार निवडणूकीच्या रिंगणात आहेत.

****

लोकसभा निवडणुकीमध्ये मतदानाची टक्केवारी वाढवण्यासाठी तसंच मतदारांना मतदानासाठी प्रोत्साहित करण्यासाठी नावीन्यपूर्ण उपक्रम राबवण्यात येत आहेत. ठाणे जिल्ह्यात या अंतर्गत महिलांसाठी गुलाबी, युवकांसाठी पिवळ्या तर दिव्यांगांसाठी निळ्या रंगात मतदान केंद्रं सजवली जात आहेत. भिवंडी ग्रामीण या

मतदार संघामधील सारंग गावातील ३२१ क्रमांकाचं मतदान केंद्र हे आगरी–कोळी संस्कृतीनं सजवण्यात येत आहे. ठाण्याचे जिल्हाधिकारी तथा जिल्हा निवडणूक अधिकारी अशोक शिनगारे यांनी मतदारांना मतदान करण्याचं आवाहन केलं आहे.

****

नाशिक आणि दिंडोरी लोकसभा मतदार संघासाठी तब्बल ७ हजार मतदान यंत्रांसह इतर साहित्य घेऊन मतदान पथकं आपापल्या निर्धारित मतदान केंद्रांकडे रवाना होत आहेत. नाशिक जिल्ह्यात ४ हजार मतदान केंद्र आहेत. जिल्ह्यातल्या दिंडोरी मतदार संघात १ हजार ९२२ तर नाशिक मतदार संघात १ हजार ९१० मतदान केंद्र आहेत.

****

धुळे लोकसभा मतदार संघातल्या १ हजार ७०४ मतदान केंद्रांवर कर्मचारी रवाना होत आहेत. मतदानासाठी जवळपास साडेआठ हजार कर्मचाऱ्यांची नियुक्ती करण्यात आली आहे. मतदान कर्मचाऱ्यांना मतदान केंद्रापर्यंत पोहोचवण्यासाठी जिल्हा प्रशासनाने ११७ बसगाड्यांसह एकूण ७५२ वाहनं तैनात केली आहेत.

****

लोकसभा निवडणुकीच्या पार्श्वभूमीवर, निवडणूक आयोगानं विविध ठिकाणांहून एकूण आठ हजार ८७९ कोटी रुपयांचा मुद्देमाल जप्त केला आहे. यामध्ये चार हजार कोटी रुपयांच्या अमली पदार्थांचा समावेश आहे. मुंबई उत्तर–पूर्व लोकसभा मतदारसंघात एकूण सहा लाख ७३ हजार ९२५ रूपयांचा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे. याप्रकरणी ५५ गुन्हे दाखल झाले असून, ५६ जणांना अटक करण्यात आल्याचं याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे.

****

काँग्रेसचे ज्येष्ठ नेते प्रतापराव भोसले यांचं सातारा जिल्ह्यात भुईंज इथं आज पहाटे वृद्धापकाळानं निधन झालं. ते नव्वद वर्षांचे होते. भुईंज गावचे सरपंच म्हणून राजकीय कारकिर्दीला सुरुवात करणाऱ्या भोसले यांनी चार वेळा आमदार म्हणून वाई–खंडाळा विधानसभा मतदारसंघाचे प्रतिनिधित्व करताना कॅबिनेट मंत्री म्हणून यशस्वी काम केलं. सातारा लोकसभा मतदारसंघातून तीन वेळा संसदेत खासदार म्हणून, तसंच विविध राष्ट्रीय समित्यांवर काम केलं आहे. त्यांच्या पार्थिव देहावर भुईंज इथं अंत्यसंस्कार करण्यात येत आहेत. महाराष्ट्र प्रदेश काँग्रेस कमिटीचे अध्यक्ष नाना पटोले यांनी भोसले यांच्या निधनाबद्दल शोक व्यक्त केला आहे.

****

नैऋत्य मोसमी पावसाचं निकोबार बेटांवर आगमन झालं आहे. हवामान विभागाने ही माहिती दिली. निकोबार द्वीप समूह, दक्षिण अंदमानचा समुद्र तसंच बंगालच्या खाडीच्या काही भागाकडे मोसमी पावसाचा प्रवास सुरू असल्याचं, याबाबतच्या वृत्तात म्हटलं आहे. येत्या ३१ मे पर्यंत मोसमी पाऊस केरळात दाखल होण्याचा अंदाज हवामान विभागाने वर्तवला आहे.

दरम्यान, पूर्वमोसमी पावसाने आज अनेक ठिकाणी हजेरी लावली. छत्रपती संभाजीनगर शहर परिसरात काही भागात आज दुपारनंतर जोरदार वाऱ्यासह पावसाच्या सरी कोसळल्या.

****

महाराष्ट्र राज्य कृषी पणन मंडळ, विभागीय कार्यालय, कोल्हापूर यांच्या मार्फत कोल्हापूर आंबा महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. कोल्हापूरसह रत्नागिरी, सिंधुदुर्ग, सोलापूर, रायगड या जिल्ह्यातील आंबा उत्पादक शेतकरी या महोत्सवात सहभागी झाले आहेत. आजपासून सुरू झालेल्या या महोत्सवामध्ये रत्नागिरी हापूस, देवगड हापूस, पायरी, केसर यासोबतच विविध ४७ प्रकारचे आंबे उपलब्ध आहेत. येत्या २३ मे पर्यंत हा महोत्सव चालणार आहे.

दरम्यान, सांगली जिल्ह्यात आटपाडी बाजार समितीच्या वतीनं आंबा महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. आंबा उत्पादक शेतकऱ्यांना चांगला भाव मिळण्याच्या दृष्टीने तसंच ग्राहकांना थेट शेतकऱ्यांकडून माफक दरात आंबा उपलब्ध व्हावा या हेतूनं या महोत्सवाचं आयोजन करण्यात आलं आहे. हा महोत्सव चार दिवस चालणार आहे.

****

भारतीय बॅडमिंटनपटू चिराग शेट्टी आणि सात्विक साईराज रंकीरेड्डी जोडीने थायलंड खुल्या बॅडमिंटन स्पर्धेच्या पुरुष दुहेरीचं विजेतेपद पटकावलं आहे. आज बँकॉक इथं झालेल्या अंतिम सामन्यात सात्विक चिराग जोडीने के चेन बो यांग आणि लि यू यी को या चिनी बॅडमिंटनपटूंच्या जोडीचा २१-१५, २१-१५ असा सरळ दोन गेम्समध्ये पराभव केला.

****

इंडियन प्रिमियर लीग – आय पी एल क्रिकेट स्पर्धेत आज हैदराबाद इथं सनरायजर्स हैदराबाद आणि पंजाब किंग्ज यांच्यात सामना सुरू आहे. पंजाब किंग्जनं नाणेफेक जिंकून प्रथम फलंदाजीचा निर्णय घेत निर्धारीत २० षटकांत पाच बाद २१४ धावा

केल्या. शेवटचं वृत्त हाती आलं तेव्हा सनरायजर्स हैदराबाद संघानं सहाव्या षटकांत दोन बाद ८३ धावा केल्या होत्या.
दरम्यान, आज दुसरा सामना राजस्थान रॉयल्स आणि कोलकाता नाईट रायडर्स यांच्यात गुवाहाटीच्या बरसापारा क्रिकेट मैदानावर होणार आहे. हा या स्पर्धेतला शेवटचा साखळी सामना आहे.

****

मुंबईच्या सांस्कृतिक कलादर्पणचा यंदाचा नाट्यसेवा गौरव पुरस्कार डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठाच्या नाट्यशास्त्र विभागातले निवृत्त प्राध्यापक डॉ. जयंत शेवतेकर यांना जाहीर झाला आहे. मुंबईत भायखळा इथल्या लोकशाहीर अण्णाभाऊ साठे नाट्यगृहात येत्या २३ मे रोजी हा पुरस्कार त्यांना प्रदान केला जाईल.

****

परभणी जिल्हा तलाठी संघाची नूतन कार्यकारणी एकमताने निवडण्यात आली. जिल्हाध्यक्ष पदी श्यामसुंदर सूर्यवंशी, कार्याध्यक्षपदी रामप्रसाद कोल्हे, तर उपाध्यक्षपदी शंकर राठोड यांची निवड करण्यात आली. महाराष्ट्र राज्य तलाठी संघाचे अध्यक्ष अनिल सूर्यवंशी यांच्या अध्यक्षतेखाली झालेल्या बैठकीत ही निवड प्रक्रिया पार पडली.

****

घाटकोपर जाहिरात फलक दुर्घटनेच्या पार्श्वभूमीवर लातूर शहरातील अनाधिकृत फलकांवर महानगरपालिका प्रशासनाकडून कारवाई सुरू आहे. महानगर पालीकेनं मोठ्या आकाराचे तीन फलक आणि ०८ बॅनर नियम बाह्य ठरवले असून ज्या खाजगी मालमत्तांवर होर्डींग्ज लावण्यात आलेले आहेत त्या मालमत्ता धारकांना उद्या पर्यंतची मुदत दिली आहे. सदरील फलकांमुळे भविष्यात कोणतीही दुर्घटना किंवा अपघात होऊन जीवीत अथवा वित्तहानी झाल्यास संबंधीत आस्थापना आणी मालमत्ताधारकांवर सदोष मनुष्यवधाचा गुन्हा दाखल करण्यात येईल असा इशारा लातूर महापालिकेने दिला आहे.

****